# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा. क्र. 71/2024  दिनांक : 22.02.2024

## 1)मो.सा.चोरी :–

**वजिराबाद** :– दिनांक 19.02.2024 रोजी 16.35 ते 17.20 वा. चे दरम्यान, **तेलंग हॉस्पीटल समोरून डॉक्टर लाईन नांदेड येथे**, यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पलेंडर प्लस कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एई–2793 किंमती 30,000/– रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी प्रमोद पि. रामप्रसाद गट्टाणी, वय 47 वर्षे, व्यवसाय डॉक्टर, रा. न्यायनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 86/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/591 नागरगोजे, मो. क्रं. 8412879395** हे करीत आहेत.

## 2)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**हदगांव** :–दिनांक 21.02.2024 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **उमरखेड फाटा ता. हदगांव जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने त्याचे बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच–26/बीई–7045 किंमती 5,00,000/–रू मध्ये नऊ म्हशीचे हल्ले किंमती 28,000/–रू चे जनावरे असा एकुण किंमती 5,28,000/–रू मध्ये निर्दयपणे क्षमतेपेक्षा जास्त कोंबुन, पायास बांधुन क्रुरपणे इजा होईल अशा पध्दतीने अवैधपणे कत्तलकरण्यासाठी वाहतुक करून निष्काळजीपणे चालवतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2828 लक्ष्मण शिवाजीराव गाडे, ने. पोस्टे हदगांव** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरन 43/2024 कलम 6 महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम 1976 सह कलम 11(1)(ड)11(1)(इ) प्राण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम 1960 कायदा सह कलम 125 मोवाका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2938 जुडे, मो. नं. 7620215669** हे करीत आहेत.

## 3)जुगार :–

**अर्धापुर** :–दिनांक 21.02.2024 रोजी चे 16.15 वा. चे सुमारास, **अर्धापुर येथील सय्यद फंक्शन हॉलच्या पाठीमागे मोकळया जागेत ता. अर्धापुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 10,900/–रुपये व साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/615 विजय रामराव कदम, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 63/2024 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1839 कांबळे, मो.क्रं. 9823343366** हे करीत आहेत.

## 4)प्रोव्हिबीशन :–

**1)उमरी** :– दिनांक 21.02.2024 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **मामा चौक उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 7200/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1509 ओमकारेश्वर साहेबराव नागुलवाड, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 78/2024 कलम 65 (ई),(ब), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2354 गेडाम, मो.नं. 9421768528** हे करीत आहेत.

**2)बिलोली** :– दिनांक 21.02.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **मौ. सावळी तळयाचे पाळुवर ता. बिलोली जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1920/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2320, आनंदा गोपीराव शिंदे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 18/2024 कलम 65 (ई),(ब), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोना/2561 बादेवाड, मो.नं. 8806404509** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्र. 72/2024 दिनांक : 22.02.2024**

## सिंदखेड पोलीसांचा असाही प्रमाणीकपणा, घडविले माणुसकीचे दर्शन...!!

आज दिनांक 22.02.2024 रोजी मौ. वाई बाजार येथे **मा. खा. वृंदा खरात** यांचे जाहीर सत्कार बंदोबस्त असल्या कारणाणे त्यांचे बंदोबस्त कामी सपोनि **श्री सुशांत किनगे**, पोकॉ 1133/पवार, होमगार्ड म्याकलवार /742, जुनगरे/752, जाधव 761, सुर्यवंशी/681, दासरवार/700, गुंजकर/726 हे बंदोबस्तामध्ये तैनात होते. बंदोबस्ता दरम्यान यातील होमगार्ड यांना वाई फाटा येथे एका खुर्चीवर एक बेवारस पिशवी (बटवा) सापडली. होमगार्ड यांनी ती पिशवी पोकॉ पवार यांना सांगीतले असता पवार यांनी पिशवी तपासल्यावर त्यामध्ये नगदी 5400/—रू व दोन तोळे वेडचे सोने अंदाजे किंमती 1,19,600/—रू चे सापडले व सोबत विठाई दाल मिल केंद्राची पावती सापडली. मिलच्या मालकांनी पावतीवर मोहिते नावाच्या व्यक्तीची माहिती दिली. पोकॉ पवार यांनी **चंद्रभागा दौलतराव मोहिते, वय 81 वर्षे**, रा. मलकागुडा ता. माहुर जि. नांदेड या महिलेचा फोनद्वारे संपर्क केले असता त्या माहुर बसस्थानक येथे असल्याचे सांगीतले. सदर महिलेला वाई बाजार येथे बोलावुन सपोनि सुशांत किनगे साहेब यांना माहिती देवुन त्यांचे हस्ते सदर महिला यांना नगदी 5400/—रू व दोन तोळे सोने असा एकुण 1,25,000/—ऐवज परत केला.

विशेष म्हणजे सदरील वृध्द म्हातारी डोळयाच्या ऑपरेशनसाठी तिच्या मुलीला सोबत घेवुन यवतमाळ येथील दवाखान्यात जात असतांना वाई बाजारपासुन माहुरपर्यंत निघुनही गेली होती. माहुर येथे पोचल्यानंतर बटवा गायब झाल्याचे लक्षात येताच मायलेकी रडायला लागल्या. तेवढयात सिंदखेड पोलीसांनी फोन करून सदर बटवा सापडल्याची माहिती देताच दोघीही मायलेकी परत वाई बाजार फाटयावर आल्यानंतर सपोनि सुशांत किनगे व सहकारी कर्मचारी व होमगार्ड व ग्रामस्थांच्या उपस्थितीत सदरचा बटवा त्या वृध्द म्हातारीला सुपूर्द करण्यात आला. यावेळी म्हतारी व तिच्या मुलीच्या डोळयांत आनंदाश्रु वाहत होते. त्या पोलीसांचे मनापासुन आभार मानत होते.

एकंदरीत बेवारस सापडलेल्या बटव्यातील सव्वा लाखांचा मुद्येमला परत करतांना सिंदखेड पोलीसांनी आपल्या सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण देत सिंदखेड पोलीसांनी माणुसकीचे दर्शन घडवले. त्यांच्या या उत्तम कामगीरीमुळे **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री खंडेराव धरणे**, अपर पोलीस अधीक्षक भोकर, **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड, **श्री रामकृष्ण मळघणे,** उपविभागीय पोलीस अधीकारी किनवट यांनी सिंदखेड पोलीसांचे अभिनंदन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

